| MHKO110018052022 | **नियमित दिवाणी दावा क्र. २३२/२०२२ मधील निशाणी क्रमांक ८७ खालील आदेश**<br>**रंगराव महादेव माने वगैरे**<br>**विरुध्द**<br>**लक्ष्मी खंडेराव कोळी वगैरे** |
|---|---|

वादी क्र. ४ ते ८ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यासाठी केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करून विरोध दर्शविला आहे.

२. वादी क्र. ४ ते ८ यांचे असे कथन आहे की, सदर कामी पुराव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे कागदपत्रे दाखल करित आहोत. तरी सदर कागदपत्रे न्यायालयाच्या कामी हजर करून घेणे महत्वाचे असलेने वादींनी सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे देउन अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शविला आहे.

३. वादीं तर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. वादी यांनी सदर दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाई मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात मुद्दे काढलेले नसून प्रकरण हे नि. ५ च्या युक्तीवादाकरिता प्रलंबित आहे. वादींनी दाखल केलेले कागदपत्रांचा विचार करता सदर कागदपत्रे दाखल करून घेतल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. पुराव्याच्या वेळी प्रतिवादींना सदर कागदपत्रावर उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. म्हणून सदर अर्ज नामंजूर करणे संयुक्तीक वाटत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अशंत:मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी कागदपत्र दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

स्वाक्षरी/–

**दिनांकः– २०/१२/२०२५**
**पेठवडगाव**

**( आर. एस. मोरे )**
**३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पेठवडगाव**